# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 08.02.2025** **वार- शनिवार**

---

**ऊस गाळप**

पुणे जिल्ह्यात 77 लाख मेट्रिक टन ऊस गाळपातून 69 लाख क्विंटल साखर तयार झाली असून तिचा उतारा सुमारे 9 टक्के आहे. गेल्या महिन्याच्या सुरुवातीला पुणे जिल्ह्यातील 29 साखर कारखान्यांची प्रतिदिन एक लाख 55 हजार मेट्रिक टन गाळप क्षमता होती. बरेच साखर कारखाने उसाअभावी तीन-चार तास किंवा त्यापेक्षा अधिक काही तास चालतात. त्यामुळं ऊस गाळप रेंगाळत सुरू आहे.

**महाजन**

आयुष्यभर साधी जीवनशैली आत्मसात करून, वाटचाल करणारे राजकारणी देशात कमी आहेत. सत्ता म्हणजे अहंकार करणं नाही, तर तो लोकांसाठी कामे करण्याचा आणि समस्या सोडविण्याचा एक मार्ग आहे, हे लक्षात घेऊन काम करणारे लोकप्रतिनिधी यशस्वी होतात, असं मत लोकसभेच्या माजी सभापती सुमित्रा महाजन यांनी पुण्यात व्यक्त केलं. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाद्वारे आयोजित चौदाव्या भारतीय छात्र संसदेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. याप्रसंगी उत्तरप्रदेश विधानसभेचे अध्यक्ष सतीश महाना, राजस्थान विधानसभेचे माजी अध्यक्ष डॉ.सी.पी.जोशी, आदी यावेळी उपस्थित होते. लोकशाहीला बळकट करण्यासाठी मान्यवरांनी प्रातिनिधिक स्वरूपात 'बेल ऑफ डेमोक्रसी'चा घंटानाद यावेळी केला. या समारंभात महाजन यांच्या हस्ते सतीश महाना यांना आदर्श विधानसभा अध्यक्ष पुरस्कार देऊन गौरविण्यात आलं.
निवडणुकीच्या दिवशी नागरिकांनी आपण लोकप्रतिनिधी का निवडत आहोत, याचा विचार करायला हवा. निकालानंतर लोकांनी आपल्याला का निवडून दिले, याचा आमदारांनी विचार केल्यास आदर्श लोकप्रतिनिधी तयार होण्याची प्रक्रिया घडेल. चांगले लोकप्रतिनिधी निवडून देणे ही देशातील प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे असं मत महाना यांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केलं.

**सक्षम**

विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून राबवण्यात येत असलेला सक्षम उपक्रम राबवण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या वाचन, लेखन आणि

गणित कौशल्यांमध्ये चांगल्याच सुधारणा दिसून आल्या आहेत. विद्यार्थ्यांना भाषा आणि गणित विषयात ‘सक्षम’ करण्यासाठी हा उपक्रम यशस्वी ठरत आहे. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये इयत्ता 3 री ते इयत्ता 8 वी या वर्गात शिक्षण घेणाऱ्या 30 हजार विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ होत आहे. 'सक्षम' उपक्रमाची दोन टप्प्यांत अंमलबजावणी होत आहे. यामधील पहिला टप्पा नुकताच पूर्ण झाला आहे. या टप्प्यात, शाळेतील पहिल्या दोन तासांमध्ये भाषा आणि गणित या विषयांसाठी प्रत्येकी साठ मिनिटं वेळ दिला जात होता. आता या उपक्रमाचा दुसरा टप्पा सुरू करण्यात आला असून यामध्ये दिवसातील 45 मिनिटं भाषा आणि 45 मिनिटं गणित विषयासाठी दिले जाणार आहेत. याशिवाय या उपक्रमांतर्गत शिक्षकांना विशेष प्रशिक्षण देण्यात आलं आहे.

**जीबीएस**

गुलियन बॅरे सिंड्रोमचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं कठोर पावलं उचलण्यास सुरूवात केली आहे. दूषित पाणी वापरून पाण्याच्या बाटल्या भरणाऱ्या अनधिकृत खाजगी आरओ प्लांट्स चालकांना प्लांट तात्काळ बंद करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. शिवाय पाण्याची गुणवत्ता आणि बॉटलिंग प्रक्रियेचा सखोल आढावा आणि मूल्यांकन केल्यानंतरच त्यांना पुन्हा प्लांट चालू करण्याची परवानगी देण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं खासगी आरओ प्लांट्सच्या पाण्याच्या नमुन्यांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये दूषित पाणी प्रामुख्यानं कूपनलिका आणि उघड्या जलस्त्रोतांचे आढळते. सध्या शहरात दूषित पिण्याचा पुरवठा करणाऱ्या अनधिकृत वॉटर बॉटलिंग आणि आर.ओ प्लांट्सवर तात्काळ कारवाई करणं आवश्यक आहे. शिवाय आर.ओ प्रकल्प बंदच्या आदेशाचं उल्लंघन करणाऱ्यांवर वैद्यकीय विभागामार्फत कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

**क्लस्टर**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात केंद्र सरकारच्या प्रधान वैज्ञानिक सल्लागार कार्यालयाच्या अंतर्गत पुणे नॉलेज क्लस्टर यांच्या सहकार्यानं, आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानावर आधारित उपक्रमाचं आयोजन पुण्यात करण्यात आलं आहे. यावेळी या उपक्रमामध्ये पुण्यातील 14 सरकारी आणि अनुदानित शाळांमधील 1000 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी यशदाचे उप संचालक डॉक्टर मल्लिनाथ कलशेट्टी यांनी विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांचं कौतुक केलं. यंदाच्या ‘ट्रान्सफॉर्मिंग स्टेम एज्युकेशन’ या संकल्पनेच्या अंतर्गत डिजिटल साधनांचा उपयोग आणि शिक्षणातील त्यांचं प्रभावी उपयोजन यावर विचार केला जात आहे असं पुणे नॉलेज क्लस्टरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर प्रिया नगराज यांनी सांगितलं.

**सनदी**
पुणे शहरातील पेठा आणि पश्चिमेकडील उपनगरांना जोडणाऱ्या नदीपात्रातील रस्त्यावरून रजपूत झोपडपट्टीपासून एरंडवण्याकडे जाणारा रस्ता आता अधिक रुंद होणार आहे. त्यासाठी सनदी अधिकाऱ्यांची निवासस्थानं असलेल्या इमारतीची काही जागा आणि ओटा वसाहतीतील घरांची काही जागा ताब्यात घेण्यात येत आहे. आठ ते दहा दिवसात हे काम पूर्ण होईल असं पथ विभाग प्रमुख अनिरूद्ध पावसकर यांनी सांगितलं.

पुणे आणि परिसरात उद्या कमाल तापमान 35 अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**